आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२७ सप्टेंबर २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- दहशतवादाविरोधात भारताचं धोरण नेहमीच निर्णायक आणि स्पष्ट राहिलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात'मध्ये प्रतिपादन

- महाराष्ट्रातल्या प्रलंबित सिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांची ग्वाही

- दुष्काळासंदर्भात १२ उपाययोजना, पंचनामे सुरू / दुष्काळग्रस्तांसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या मुख्यमंत्र्यांकडे १७ मागण्या

- आशियाई क्रीडा स्पर्धेत आज भारताला ४ रौप्य आणि ३ कांस्य पदकं

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात वेस्ट इंडीजचं भारतापुढं विजयासाठी २९६ धावांचं आव्हान /भारताची दमदार फलंदाजी, शुभमन गिलचं नाबाद शतक

<><><><><>

दहशतवादाविरोधात भारताचं धोरण नेहमीच निर्णायक राहिलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १३८वा भाग होता. उद्या सर्जिकल स्ट्राईकला १० वर्षं पूर्ण होत असल्याचं त्यांनी स्मरण केलं. नियंत्रण रेषेच्या पलीकडे जाऊन भारतीय जवानांनी दहशतवादाविरोधात केलेली कारवाई पाहून जग अचंबित झालं होतं, असं ते म्हणाले.  आताचा भारत दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेचं धोरण अवलंबत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

जनगणना हे प्रत्येक नागरिकाचं राष्ट्रीय कर्तव्य असल्याचं सांगून, त्यासाठी वेळ काढण्याचं आवाहन त्यांनी नागरिकांना केलं.

सोमनाथ मंदिराच्या विध्वंसाला यंदा एक हजार वर्षं पूर्ण झाली आहेत. हे मंदिर तोडून भारताची ओळख संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचं आज कोणतंही अस्तित्व उरलेलं नाही, मात्र

हे भव्य मंदिर आजही दिमाखानं उभं आहे, असं ते म्हणाले. त्याच वर्षी हल्ला झालेल्या मोढेरा सूर्य मंदिराचा इतिहास आणि त्याच्या पुनर्उभारणीबद्दलही त्यांनी सांगितलं.

येत्या २ ऑक्टोबरला महात्मा गांधी यांची जयंती असल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी केलं. गांधीजींनी दिलेल्या मंत्रांपैकी स्वच्छता हा महत्त्वाचा मंत्र होता असं ते म्हणाले. मुंबईतले समुद्रकिनारे स्वच्छ करण्याच्या मोहिमेसह देशभरातले जलस्त्रोत, सार्वजनिक परिसर स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांची माहिती देत, स्वच्छता हीच महात्मा गांधींना सर्वात सुंदर श्रद्धांजली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - SWACHHATA**

नशामुक्त युवा अभियानांतर्गत लाखो युवकांनी अंमली पदार्थांपासून दूर राहण्याचा संकल्प केला आहे, नशेतून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात असलेल्यांना आधार द्यावा आणि नशामुक्त युवा, विकसित भारताचा संकल्प सर्वांनी मिळून पुढे न्यावा, असं आवाहन त्यांनी केलं.

आपला समाज पूर्णतः कुपोषणमुक्त करण्याचं उद्दिष्ट प्रधानमंत्र्यांनी सर्वांसमोर ठेवलं. कुपोषणाविरुद्धच्या लढ्याला समर्पित  असल्याचं सांगत, विविध राज्यांतल्या पोषण माह उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्रातले शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि पालकांच्या प्रयत्नांचं त्यांनी विशेष कौतुक केलं.

क्रीडा क्षेत्रातल्या प्रगतीसाठी गावागावांत आणि छोट्या शहरांत प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेण्याची गरज प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून भारताची श्रद्धा, कला आणि सांस्कृतिक परंपरा, सीमांपलीकडेही लोकप्रिय होत असल्याची प्रचिती आल्याचं मोदी म्हणाले. थायलंडमधल्या गणेश हिमाल संग्रहालयाचा आणि महाराष्ट्रातल्या अष्टविनायक परंपरेशी असलेल्या त्याच्या नात्याचा उल्लेख त्यांनी केला.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणाची व्यापक कामं, रेनवॉटर हार्वेस्टिंगची प्रभावी अंमलबजावणी, तसंच प्रलंबित सिंचन प्रकल्पांना गती देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी आज दिली. धुळे इथं आयोजित एका कार्यक्रमात ते

बोलत होते. पडळसे आणि नारपार प्रकल्पांसाठी ८०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे, तसंच उकाई धरणातलं पाणी महाराष्ट्राला उपलब्ध करून देण्यासाठी केंद्राच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.

सुलवाडे-जामफळ आणि तापी धरण उपसा सिंचन योजनेची कामं वेगानं पूर्ण करायचे निर्देश त्यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांना दिले. तसंच कामात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीत टाकायच्या सूचनाही त्यांनी केल्या.

<><><><><>

दुष्काळासंदर्भात करायच्या १२ उपाययोजनांना सुरुवात केली असून पंचनामे करायची प्रक्रियाही सुरु झाली आहे, ज्या तालुक्यांचा समावेश नाही, अशाही तालुक्यांमधल्या शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सांगितलं. ते नागपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. दुष्काळानं बाधित कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**बाइट- मुख्यमंत्री फडनवीस**

फेब्रुवारीपर्यंत ‘अल-निनो’ परिणाम राहील असं तज्ञांचं मत आहे. त्यादृष्टीनं सरकार तयारी करत आहे. प्रत्येक जिल्ह्याला उपलब्धतेनुसार पाण्याचा आराखडा करावा लागेल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण नागरिकांना तातडीचा दिलासा मिळावा, यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून १७ मागण्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी, जमीन महसूल आणि कृषी वीजबिल माफी, प्रतिकुटुंब २५ किलो मोफत धान्य, शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर १ लाख रुपये आणि शेतमजुरांना २५ हजार रुपये अनुदान,इत्यादी मागण्यांचा त्यात समावेश आहे.

<><><><><>

आशियाई क्रीडा स्पर्धेत आज महिलांच्या लांब उडी स्पर्धेत भारताच्या अँसी सोजन एडप्पिली हिने रौप्य पदक जिंकलं. पुरुषांच्या उंच उडी प्रकारात भारताच्या सर्वेश कुशारे यानेही रौप्य पदकाची कमाई केली. त्याआधी स्क्वॉशमध्ये पुरुष एकेरीत अभय सिंह यानं, तर महिला एकेरीत अनाहत सिंह हिनं रौप्यपदक मिळवलं. महिलांच्या २०० मीटर धावण्याच्या

स्पर्धेत हरिता भद्रा हिनं, तर डेकॅथलॉनमधे तेजस्विन शंकरनं कांस्य पदक मिळवलं. महिलांच्या ३ हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात पारुल चौधरीनं कांस्य पदक मिळवलं.

महिलांच्या २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत हरिता भद्रा हिनं कांस्यपदक पटकावलं. तिरंदाजीत कंपाउंड आणि रिकर्व्ह अशा दोन प्रकारांमध्ये भारताच्या महिला, पुरुष आणि मिश्र संघांनी उपांत्य फेरीत धडक मारली. भारताचा मुष्टियोद्धा अंकुश पांघल यानं पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात, तर परवीन हूडा हिनं महिलांच्या ६५ किलो वजनी गटात पदक निश्चित केलं.

बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू आणि उन्नती हुडा यांना मात्र उपांत्यपूर्व फेरीत पराभवाचा सामना करावा लागला.

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी पदक विजेत्या भारतीय खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडीज याच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज तिरुवअनंतपूरम इथं सुरु असलेल्या पहिल्या सामन्यात वेस्ट इंडीजनं भारतापुढं विजयासाठी २९६ धावांचं आव्हान ठेवलं आहे. विजया लक्ष्याचा पाठलाग करताना भारतानंही दमदार फलंदाजी सुरु ठेवली आहे. कर्णधार शउभमन गिलनं शतक ठोकलं.

भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. जॉन कॅम्पबेल आणि जस्टीन ग्रीव्हज् या जोडीनं पहिल्या गड्यासाठी केलेली १३५ धावांची भागिदारी, ग्रीव्हजचं शतक, आणि अमीर जंगूच्या नाबाद ५८ धावांच्या जोरावर वेस्ट इंडीजनं निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून २९५ धावा केल्या.

भारतातर्फे कुलदीप यादवनं ४, प्रसिध कृष्णानं २, तर नितीशकुमार रेड्डीनं १ गडी बाद केला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ३२ षटकात १ बाद २१५ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

गुजरातमध्ये साबरमती इथे दीड हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या प्रमुख रेल्वे विकास प्रकल्पांचं उद्घाटन, भूमिपूजन आणि प्रारंभ आज केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांच्या हस्ते झाला. तसंच साबरमती स्थानकावरून त्यांनी देशातल्या पहिल्या

एलएनजीवर चालणाऱ्या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. अमित शहा यांनी यावेळी जनसभेला संबोधित केलं.

अमित शाह यांनी आज विश्व हिंदू परिषदेचे माजी अध्यक्ष दिवंगत अशोक सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षाचं उद्घाटन केलं. अशोक सिंघल यांनी आपलं संपूर्ण आयुष्य हिंदुत्व, देश आणि समाजसेवेसाठी वाहून घेतलं होतं असं शाह यावेळी म्हणाले.

<><><><>

भारत कोणत्याही देशाच्या भूभागावर कब्जा करणार नाही, मात्र, आमची सुरक्षा आणि धोरणात्मक स्वातंत्र्याला धोका उद्भवला, तर त्याचं रक्षण करण्याकरता आम्ही कटिबद्ध आहोत, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते. भारताला जागतिक स्थैर्य अपेक्षित असलं तरी, ते धोरणात्मक स्वातंत्र्याची किंमत मोजून अपेक्षित नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. भारताविरोधात दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या करणाऱ्या कोणत्याही देशासोबत संवाद साधायचा प्रश्नच नाही, असंही ते म्हणाले.

<><><><>

शाश्वत विकास, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती आणि प्लास्टिकला हरित पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्रानं बांबू-आधारित अर्थव्यवस्था विकसित करावी असं आवाहन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केलं. ते आज मुंबईत बांबू-आधारित अर्थव्यवस्था आणि शाश्वतता या विषयावरच्या शिखर परिषदेत बोलत होते.

//<><><><>//